# प्रकरण १.
# भारतीय अर्थव्यवस्था

## अर्थशास्त्र

अर्थशास्त्र हे एक सामाजिकशास्त्र आहे, जे वस्तु आणि सेवा यांच्या उत्पादन, वितरण आणि वापराचे विश्लेषण करते. अर्थशास्त्राचे जनक ॲडम स्मिथ या तत्त्ववेत्त्याने अर्थशास्त्राची व्याख्या पुढीलप्रमाणे सांगितली, ‘अर्थशास्त्र म्हणजे राष्ट्राच्या संपत्तीच्या स्वभाव वैशिष्टयांची आणि कारणांची चिकित्सा होय.’





➢ सर्वसाधारण अर्थ व्यवस्थेचे वर्गीकरण वेगवेगळया पध्दतिने केली जाते पण जागतिक बॅंकेने यासंदर्भात केलेली व्याख्या महत्वाचे समजली जाते ते पूढील प्रमाणे आहे.

**१) विकसित अर्थव्यवस्था** : ज्या अर्थव्यवस्थेत प्रती दरडोई उत्पन्न (GNI च्या आधारावर) १२२३५ डॉलर्स पेश्रा जास्त असेल त्याला विकसित अर्थव्यवस्था म्हणतात. उदा. अमेरिका , ऑस्ट्रेलिया , जपान

**२)विकसनशिल अर्थव्यवस्था :** ज्या अर्थव्यवस्थेत प्रती दरडोई उत्पन्न (GNI च्या आधारावर) १२२३५ डॉलर्स ते १००५ डॉलर्सपेक्षा जास्त असेल त्याला विकसनशील अर्थव्यवस्था म्हणतात. उदा. भारत श्रीलका चीन

**३) अविकसित अर्थव्यवस्था** : ज्या अर्थव्यवस्थेत प्रती दरडोई उत्पन्न (GNI च्या आधारावर) १००५ डॉलर्सपेक्षा कमी असेल त्याला अविकसित अर्थव्यवस्था म्हणतात. उदा. सिरीया,कांगो , सुदान

### ❖ अर्थव्यवस्थांचे प्रकार :




### ❖ भांडवलशाही अर्थव्यवस्था :-

- ज्या अर्थव्यवस्थेत उत्पादनाची साधने खाजगी मालकीची असतात आणि उत्पादनाचे कार्य आणि उत्पादनाचे विभाजन बाजार यंत्रणेसाठी होते, अशा अर्थव्यवस्थेला ‘भांडवलशाही अर्थव्यवस्था’ असे म्हणतात.
- उदा. अमेरिका व युरोपियन अर्थव्यवस्था. **उदा :** अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स
- या अर्थव्यवस्थेला Laissez Faire आणि Self-managed economy असेही म्हणतात.

#### ➢ वैशिष्टये :-

१. खाजगी मालकी हक्क हे भांडवलशाहीचे मूलभूत वैशिष्टय आहे.
२. उद्योग, व्यवसाय उभारणी, निवड यासंबंधीचे निर्णय मालक स्वतंत्रपणे घेऊ शकतो.
३. किंमत ठरविण्याची प्रक्रिया मुक्तपणे चालते. म्हणजेच ती सरकारी हस्तक्षेपापासून मुक्त असते. म्हणून भांडवलशाहीला ‘मुक्त अर्थव्यवस्था’ (Market Oriented Economy) असेही म्हणतात.
४. अशा अर्थव्यवस्थेमध्ये मुख्यत: नफा मिळविण्याच्या हेतूने उत्पादन केले जाते.

#### ➢ दोष :-

१. भांडवलशाही अर्थव्यवस्थेमुळे आर्थिक सत्तेचे केंद्रीकरण होऊन आर्थिक विषमता वाढते.
२. जास्तीत जास्त नफा कमविणे हे प्राथमिक उद्दिष्ट असल्याने गरीबी, बेरोजगारी, कामगार कल्याण, पर्यावरण इ. सामाजिक व आर्थिक समस्यांचा विचार केला जात नाही.
३. चैनीच्या वस्तूंचे प्रमाण वाढून जीवनावश्यक वस्तूंच्या उत्पादनाकडे दूर्लक्ष होऊ शकते. विकसनशील अर्थव्यवस्थेसाठी ही बाब घातक ठरु शकते.

## ❖ समाजवादी अर्थव्यवस्था (Socialist Economy) :-




- ज्या अर्थव्यवस्थेत उत्पादनाची साधने सरकारच्या म्हणजेच सार्वजनिक मालकीची असतात आणि उत्पादनाचे कार्य व विभाजन सरकारमार्फतच होते, अशा अर्थव्यवस्थेला 'समाजवादी अर्थव्यवस्था' असे म्हणतात. या अर्थव्यवस्थेमध्ये देशातील भांडवलावर वैयक्तिक मालकीहक्क प्रस्थापित होऊ शकत नाही.
- उदा. रशिया, उत्तर कोरिया, चीन, कोंगा, द. सुदान इत्यादींची अर्थव्यवस्था समाजवादी स्वरुपाची आहे.

### ➢ वैशिष्टये :-

१. उत्पादनाची साधने सरकारी मालकीची असतात. म्हणजेच या अर्थव्यवस्थेत सार्वजनिक क्षेत्राचे वर्चस्व असते. साधन सामुग्रीचा वापर समाज हितासाठी होतो.
२. उत्पन्न आणि संपत्तीबद्दलचे करार करणे, उद्योग सुरु करणे इ. बाबत निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य व्यक्तींना नसते.
३. वस्तू व सेवांचे उत्पादन वैयक्तिक नफ्यासाठी होत नाही. सर्व आर्थिक निर्णय सरकार घेते.
४. मूलभूत गरजेच्या वस्तू सर्वांना कमीत कमी किंमतीत व किमान प्रमाणात प्राप्त करुन देण्याचा निर्णय केला जातो.
५. वस्तू व सेवांचे उत्पादन, वाटप, किंमती इ. बाबी बाजार यंत्रणेवर अवलंबून नसून त्याबद्दलचे निर्णय शासन घेते.
६. सामाजिक व आर्थिक समता प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने ही अर्थव्यवस्था जास्त उपयुक्त ठरते.

## ❖ मिश्र अर्थव्यवस्था :-

- भांडवलशाही आणि समाजवादी अर्थव्यवस्था या दोहोंमधील दोष टाळून चांगल्या गुणांचा समन्वय साधण्याचा प्रयत्न करणाऱ्या अर्थव्यवस्थेला 'मिश्र अर्थव्यवस्था' असे म्हणतात. या अर्थव्यवस्थेत सार्वजनिक व खाजगी क्षेत्राचे सह अस्तित्व असते.
- उदा. भारतीय अर्थव्यवस्था. सुरुवातीला भारतीय अर्थव्यवस्था भांडवलशाही वैशिष्टये वाढीस लागली होती.

## ❖ विकसित व विकसनशील अर्थव्यवस्था :-

- अमेरिका, इंग्लंड, जर्मनी, फ्रान्स, जपान, ऑस्ट्रेलिया इत्यादी राष्ट्रे विकसित गटात मोडतात. विकसित अर्थव्यवस्थांमध्ये दरडोई राष्ट्रीय उत्पन्नाचे मोठे प्रमाण, मोठया प्रमाणावरील औद्योगिकीकरण, शहरीकरण, साक्षरतेचे जास्त प्रमाण, घटता जन्मदर व मृत्यूदर इ. लक्षणे दिसून येतात.
- भारत, म्यानमार, पाकिस्तान, श्रीलंका तसेच आफ्रिका व दक्षिण अमेरिकेतील बहुतेक देश हे विकसनशील या गटात मोडतात. विकसनशील अर्थव्यवस्थांमध्ये वरील लक्षणे कमी प्रमाणात दिसून येतात. मात्र ही राष्ट्रे आपल्या समस्या दूर करण्यासाठी सतत प्रयत्नशील असतात. म्हणून यांना 'अविकसित' किंवा 'अल्पविकसित' म्हणण्याऐवजी 'विकसनशील' किंवा 'विकासोन्मुख' म्हणणे जास्त योग्य ठरते.

# भारतीय अर्थव्यवस्था




भारतीय अर्थव्यवस्था ही मिश्र अर्थव्यवस्था म्हणून ओळखली जाते. कारण यामध्ये भांडवलशाही व समाजवादी अशा दोन्ही अर्थव्यवस्थांची वैशिष्टये आढळतात. स्वातंत्र्यानंतर जेव्हा देशांच्या सर्वांगीण आर्थिक विकासाची धोरणे राबविण्यास सुरुवात झाली, तेव्हा देशातील भांडवलबाजार अविकसित अवस्थेत होता. परंतु पायाभूत संरचनांच्या विकासासाठी आवश्यक भांडवलाची गरज मात्र खूप जास्त होती. अशावेळी सार्वजनिक क्षेत्राच्या माध्यमातून आर्थिक विकास साध्य करणे आवश्यक होते. व त्याला अनुसरुन भारताने प्रामुख्याने समाजवादी अर्थव्यवस्थेचा स्वीकार केला. तसेच इतर उत्पादक व सेवाक्षेत्रांमध्ये खाजगी क्षेत्राला चालना देण्याचा प्रयत्न केला. सुरुवातीच्या काळात भारतीय अर्थव्यवस्था समाजवादी अर्थव्यवस्थेला जास्त जवळची होती. म्हणजेच अर्थव्यवस्थेचे खाजगी क्षेत्राच्या तुलनेत सार्वजनिक क्षेत्राला जास्त महत्त्व होते. १९९०-९१ च्या आर्थिक उदारीकरणानंतर मात्र भारतीय अर्थव्यवस्थेतील भांडवलशाही वैशिष्टये वाढीस लागली. परिणामी अलिकडच्या काळात सार्वजनिक क्षेत्राचा हळूहळू संकोच होत आहे व खाजगी क्षेत्राचा विस्तार होत आहे. या व्यतिरिक्त भारतीय अर्थव्यवस्थेत इतरही आणखी काही वैशिष्टये आहेत.

## १. कृषी क्षेत्राचे महत्त्वपूर्ण स्थान :–

- सुरुवातीच्या काळात भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये आर्थिक विकास व रोजगार निर्मितीतील वाटा या दोन्ही दृष्टीने कृषी क्षेत्राचे महत्त्व सर्वात जास्त होते. पण नंतर हळूहळू स्थूल देशान्तर्गत उत्पादनातील कृषी क्षेत्राचा वाटा कमी होत जाऊन २०११-१२ मध्ये तो १४.१ टक्क्यांपर्यंत खाली आला होता. असे असले तरी रोजगारनिर्मिती व उदर निर्वाहासाठी आजही जवळपास ५८ टक्के लोकसंख्या अवलंबून आहे.

## २. असंतुलित आर्थिक विकास :-

- गेल्या साठ वर्षामध्ये अर्थव्यवस्थेने समाधानकारक आर्थिक विकासदर साध्य केला असला तरी विकासाच्या पातळीमध्ये आर्थिक क्षेत्रानुसार भौगोलिक तसेच लोकसंख्येनुसार मोठया प्रमाणात विषमता आढळते. देशाच्या आर्थिक विकासाची गती काही विशिष्ट राज्यांवरच अवलंबून आहे. तसेच क्षेत्रामध्ये विचार करता तृतीयक क्षेत्राचा विकास दर १० टक्क्यांच्या जवळपास तर प्राथमिक क्षेत्राचा विकासदर नेहमीच २ ते ४ टक्क्यांचा दरम्यान आढळतो. परिणाम आर्थिक विषमता वाढीस लागत आहे. असे असले तरी आर्थिक विषमतेचा सुचकांक म्हणून गिनी सहगुणक विचारात घेता २०११ च्या आकडेवारीनुसार चीन, श्रीलंका, ब्राझील, द. आफ्रिका, थायलँड यासारख्या मानवी विकास निर्देशांक जास्त असणाऱ्या देशांच्या तुलनेत भारतातील आर्थिक विषमता कमी आहे.

## ३.भांडवलाची उपलब्धता :-

- आर्थिक विकासाच्या सुरुवातीच्या टप्प्यात भांडवलाची कमतरता खूप जास्त होती. अर्थव्यवस्थेच्या विकासाबरोबर भांडवलनिर्मितीचा वेग देखील वाढत गेला. आर्थिक उदारीकरणानंतर त्याला आणखी चालना मिळाली. परिणामी अर्थव्यवस्थेच्या विकासातील खाजगी क्षेत्राचे महत्त्व हळूहळू वाढत चालले आहे. असे असले तरी देशांतर्गत भांडवलनिर्मितीचे उद्दिष्ट कधीही पूर्णत: साध्य झालेले नाही. त्यामुळे देशांतर्गत दिवसेंदिवस परकीय भांडवलावरील अवलंबित्व हे वाढतच आहे. देशांतर्गत बचतीला चालना देणे व गुंतवणूक संस्थांचा विकास साध्य करणे या गोष्टी भांडवलबाजाराच्या विकासासाठी आवश्यक आहेत.

| वाणिज्यविषयक कायदे | |
|---|---|
| भारतीय भागीदारी कायदा (Indian Partnership Act) | इ.स.१९३२ |
| कामगार नुकसान भरपाई कायदा (Workers Compensation Act) | इ.स.१९२३ |
| Trade Union Act | इ.स.१९४७ |
| ग्राहक संरक्षण कायदा (Consumer Protection Act) | इ.स.१९८६ |
| भारतीय उद्योगंधदा कायदा (Indian Factory Act) | इ.स.१९४८ |
| Indian Contract Act | इ.स.१८७२ |
| Sale of Goods Act | इ.स.१९३० |
| Indian Negotiable Instrument Act | इ.स.१८८१ |
| महाराष्ट्र स्टेट को - ऑपरेटीव्ह ॲक्ट | इ.स.१९६० |
| Industrial Disputes Act | इ.स.१९४८ |
| संयुक्त भांडवली संस्था कायदा (Joint Stock Company Act) | इ.स.१९५६ |
| अत्यावश्यक वस्तु कायदा | इ.स.१९८५ |
| Indian Company Act | इ.स.१९५६ |
| Indian Patent Act | इ.स.१९७० |
| मक्तेदारी नियंत्रण कायदा (Monopoly Restrictive Trade Practices Act) | इ.स.१९६९ |

❖ **भारतीय अर्थव्यवस्थेची क्षेत्रे :-** अर्थव्यवस्थेतील आर्थिक क्रियांची साधारणत: ३ क्षेत्रांमध्ये विभागणी करुन अर्थव्यवस्थेचे क्षेत्रीय वर्गीकरण करतात. फिशर (१९३३) या तज्ज्ञाने सर्वप्रथम प्राथमिक, द्वितीयक, तृतीयक असे क्षेत्रीय वर्गीकरण सुचविले. फिशरने प्राथमिक क्षेत्रात कृषी आणि द्वितीयक क्षेत्रात उद्योगांचा समावेश केला, तर उर्वरीत आर्थिक क्रियांचा समावेश तृतीयक क्षेत्राला सेवाक्षेत्र केला. कोलीन क्लार्क (१९०५-१९८९) या तज्ज्ञाने तृतीयक क्षेत्राला सेवाक्षेत्र म्हणून संबोधण्यास सुरुवात केली आणि त्यात प्राथमिक व द्वितीयक क्षेत्राला पूरक असणाऱ्या आर्थिक क्रियांचा समावेश केला.


**अर्थव्यवस्थेची क्षेत्रे**

| क्षेत्रे | प्राथमिक | द्वितीयक | तृतीयक |
|---|---|---|---|
| या क्षेत्रात काय मोडते ? | आर्थिक क्रिया ज्या नैसर्गिक स्त्रोतांपासून उत्पादने घेतात. | आर्थिक क्रिया ज्या नैसर्गिक उत्पादनांचे रुपांतर इतर उत्पादनांमध्ये करतात. | प्राथमिक व द्वितीयक क्षेत्राला उत्पादन करण्यासाठी साहाय्यभूत ठरणाऱ्या क्रिया |
| उदा. | ऊस, कापूस, दूध उत्पादन, कोळसा उत्खनन | साखर, कापड, दूध पावडर, वीटा तयार करणे | वाहतूक, दळणवळण, जाहिरात, व्यापार |
| पर्यायी नावे | कृषी व संलग्न क्षेत्र | उद्योग क्षेत्र | सेवाक्षेत्र |

**विभागवार वर्गीकरण**

| विभाग | वर्णन | क्षेत्र |
|---|---|---|
| A | कृषी, वने व मासेमारी | प्राथमिक |
| B | खाणकाम व उत्खनन | द्वितीयक |
| C | उत्पादन | |
| D | वीज, वायू, बाष्प व वातानुकूलन | |
| E | पाणीपुरवठा, गटारी, कचरा व्यवस्थापन, प्रतिबंधात्मक क्रिया | |
| F | बांधकाम | |
| G | घाऊक व किरकोळ व्यापार, मोटारवाहन व दुरुस्ती | तृतीयक |
| H | वाहतूक व साठवण | |
| I | निवासव्यवस्था व अन्नसेवा उपक्रम | |
| J | माहिती व दळणवळण | |
| K | वित्तीय आणि विमासेवा | |
| L | रिअल इस्टेट सेवा | |
| M | व्यावसायिक, वैज्ञानिक व तांत्रिक उपक्रम | |
| N | प्रशासकीय व आधारसेवा उपक्रम | |
| O | शासकीय प्रशासन व संरक्षण, सक्तीची सामाजिक सुरक्षा | |
| P | शिक्षण | |
| Q | मानवी आरोग्य व सामाजिक सेवा उपक्रम | |
| R | कला, मनोरंजन | |
| S | इतर सेवा उपक्रम | |
| T | कुटुंबसंस्था स्वत:साठी चालवत असलेले उपक्रम | |
| U | सीमेपलीकडील संस्थांचे उपक्रम | |

## क्लार्क मॉडेल




कोलीन क्लार्क (१९०५-१९८९) या तज्ज्ञाने अर्थव्यवस्थेतील विविध आर्थिक क्रियांच्या विकासाचे रेखालेखा स्वरुपात एक प्रतिमान मांडले. या प्रतिमानाला क्लार्क मॉडेल असे म्हणतात. शेजारी हा रेखा लेख दाखविला आहे. रेखा लेखाच्या तळाशी अर्थव्यवस्थेच्या विकासाच्या अवस्थेचे ३ टप्पे दर्शविले आहेत.

**१. प्राथमिक अवस्था** – सुरुवातीला अर्थव्यवस्था कृषीवरच (agrarian) आधारीत असल्यामुळे रोजगारनिर्मितीत सर्वाधिक वाटा कृषीक्षेत्राचा असतो. द्वितीयक क्षेत्राचा वाटा तुलनेने कमी असतो.


**२. द्वितीय अवस्था** - उद्योगक्षेत्राचा विकास होतो. अर्थव्यवस्था औद्योगिक अर्थव्यवस्था (industrial economy) बनते. कृषी क्षेत्राचा वाटा घटत जावून सेवा क्षेत्राचा वाटा दिसू लागतो.

**३. तृतीय अवस्था** - कृषी क्षेत्राचा वाटा झपाटयाने कमी होतो. उद्योग क्षेत्राचा वाटा स्थिर राहतो, तर सेवाक्षेत्राचा वाटा तीव्र गतीने वाढत जातो. तेथून पुढे चतुर्थक क्षेत्राचा वाटा दिसू लागतो.

## गिनी गुणांक

- असमान वाटपाच्या अभ्यासासाठी गिनी गुणांक मोजण्यासाठी एक आलेख काढतात. क्ष-अक्षावर कमी उत्पन्न असलेल्या लोकांच्या संख्येपासून जास्त उत्पन्न मिळविणाऱ्या लोकांचे एकुण लोकसंख्येतील प्रमाण मांडले जाते व य-अक्षावर त्यांचा एकुण उत्पन्नातील वाटा मांडला जातो.
- जर सर्वांच्या उत्पन्नात समानता असेल, तर ४५° अंशातील सरळ रेखालेख तयार होतो. पण जर उत्पन्नात विषमता असेल तर या रेखालेखाला वक्रता येते. याला लॉरेंझ वक्ररेषा (Lorenze curve) असे म्हणतात. आकृतीत दाखविल्याप्रमाणे वक्ररेषेच्या वरील क्षेत्रफळाला A नाव देतात व खालील भागाला B नाव देतात. याच्या किंमतीला गिनी गुणांक म्हणतात.
- गिनी गुणांक ० म्हणजे, त्या देशात संपूर्ण आर्थिक समानता आहे, तर गिनी गुणांक १ म्हणजे त्या देशात सर्वाधिक आर्थिक तफावत आहे. गिनी गुणांकाला १०० ने गुणल्यास आपल्याला गिनी निर्देशांक मिळतो. गिनी निर्देशांक ० म्हणजे, त्या देशात संपूर्ण आर्थिक समानता आहे, तर गिनी निर्देशांक १०० म्हणजे त्या देशात सर्वाधिक आर्थिक तफावत आहे.

गिनी गुणांक $g = \frac{A}{A + B}$




### गिनी, पंचमक गुणोत्तर आणि पाल्मा गुणोत्तर २०१० ते २०१५ मधील पाहणीनुसार

| | गिनी निर्देशांक | पंचमक गुणोत्तर | पाल्मा गुणोत्तर |
|---|---|---|---|
| अमेरिका | ४१.१ | ९.१ | २.० |
| भारत | ३५.२ | ५.३ | १.५ |
| नायजर | ३४.० | ५.४ | १.४ |
| नॉर्वे | २५.९ | ३.८ | ०.९ |

# प्रकरण २.
# भारतीय अर्थव्यवस्थेसमोरील आव्हाने






सन १९४७ मध्ये भारत स्वतंत्र झाला. त्या वेळी भारतीय अर्थव्यवस्था अत्यंत मागासलेली होती. दारिद्रय, उपासमार व रोगराई यांसारख्या समस्या गंभीर स्वरुपाच्या होत्या. या समस्या सोडविण्यासाठी नियोजनबद्ध विकास, समाजवादी समाजरचना, कल्याणकारी राज्य या संकल्पनांच्या बरोबरच मिश्र अर्थव्यवस्थेचे प्रारुप किंवा आर्थिक व्यवहार पद्धती स्वीकारली. त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेची प्रगती हळूहळू होत गेली. १९५१ (पंचवार्षिक योजनेची सुरुवात) ते २०११ या ६० वर्षात उद्योग, शेती, व्यापार व वित्त इ. क्षेत्रांत देशाची मोठया प्रमाणात प्रगती झाली. परिणामी, अल्पविकसित अर्थव्यवस्थेकडून विकसनशील अर्थव्यवस्थेकडे देशाची वाटचाल सुरु झाली. १९९१ पासून नवीन आर्थिक धोरणाचा स्वीकार करण्यात आला. उदारीकरण (Liberalistion) खासगीकरण (Privatisation) आणि जागतिकीकरण (Globalisation) ही विकासनीतीची त्रिसूत्री स्वीकारल्या नंतर अर्थव्यवस्थेची वेगाने प्रगती होऊ लागली. एक उद्योन्मुख अर्थव्यवस्था (Emerging Econmomy) महासत्तेच्या दिशेने वाटचाल करणारी अर्थव्यवस्था म्हणून भारतीय अर्थव्यवस्था जगापुढे आली. पण जगातल्या विकसित देशांबरोबर आपल्या अर्थव्यवस्थेची तुलना केली असता. आपल्या अर्थव्यवस्थेच्या समस्या, ठळक उणिवा आणि अर्थव्यवस्थेपुढील आव्हाने प्रकर्षाने जाणवतात. दारिद्रय, बेरोजगारी ही त्यातील काही महत्त्वाची भारतीय अर्थव्यवस्थेपुढील आव्हाने आहेत.

## दारिद्रय (Poverty)

भारतीय अर्थव्यवस्थे समोरील किंवा भारतीय नियोजन कर्त्यासमोरील सर्वात मोठे आव्हान म्हणजे देशातील समूळ दारिद्रयाचे उच्चाटन करणे होय. भारतीय नियोजनाचे एक मुळ उद्दिष्ट म्हणजे दारिद्रय उच्चाटन पण हे उद्दिष्ट गेल्या ७० वर्षात साध्य झाले नाही. असेच म्हणावे लागते. भारतात दारिद्रयाबद्दल स्वातंत्र्यपूर्व काळात दादाभाई नौरोजी, लोकहितवादी (गोपाळ हरी देशमुख) यांनी १९ व्या शतकाच्या शेवटच्या काळात विश्लेषण केले आहे. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसनेही दारिद्रयाच्या प्रश्नाबाबत १९३० च्या दशकापर्यंत चळवळी उभारल्या. १९३६ च्या राष्ट्रीय नियोजन समितीनेही (स्थापना सुभाषचंद्र बोस, अध्यक्ष पं. जवाहरलाल नेहरु) गरिबीत जीवन जगणाऱ्या लोकांचे जीवनमान उंचविण्याचे ध्येय समोर ठेवले.

**व्याख्या :** ‘‘जेव्हा व्यक्ती आपल्या कुंटुंबियांच्या आवश्यक गरजांची सुद्धा पुर्तता त्याला मिळणाऱ्या उत्पन्नातुन करु शकत नाही तेव्हा त्यास दारिद्रय म्हणतात’’

### ❖ दारिद्रयाची संकल्पना :-




- १९७० च्या दशकात प्रा. वि.म. दांडेकर आणि नीळकंठ रथ यांनी दरडोई दर दिवशी २,२५० कॅलरीज मिळवून देणारा आहार घेण्याइतपत उपभोग खर्च करणे ज्यांना शक्य नाही त्यांना ‘दरिद्री’ किंवा ‘गरीब’ मानले.
- ‘‘ज्या अवस्थेत समाजातील काही घटकांना अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण व आरोग्य यांसारख्या जीवनावश्यक वस्तू मिळणे अशक्य असते अशी अवस्था म्हणजे दारिद्रय होय’’
- नोबेल पारितोषिक विजेते अर्थतज्ज्ञ डॉ. अमर्त्य सेन यांच्या मते, ‘‘ एखाद्या व्यक्तीला त्याने जोपासलेल्या मूल्यांप्रमाणे जगता न येणे म्हणजे ‘दारिद्र’ होय’’. किंवा ‘‘सुस्थितीपासून पूर्णपणे वंचित असणे म्हणजे ‘दारिद्र’ होय.’’

- दारिद्र्य दोन प्रकारे लक्षात घेतले जाते.
  १. निरपेक्ष दारिद्र्य (Absolute Poverty)
  २. २. सापेक्ष दारिद्र्य (Relative Poverty)

## ३. निरपेक्ष दारिद्र्य (Absolute Poverty) :-

- ज्यावेळी दारिद्र्याची मोजणी करताना कुठल्या तरी 'निरपेक्ष मानकाचा' वापर केला जातो. तेव्हा त्याला निरपेक्ष दारिद्र्य असे म्हणतात. १९७३-७४ मधील दारिद्र्य मोजण्यासाठी नियोजन आयोगाने कॅलरीमूल्य हे मानक ठरविले.
- उदा. : ग्रामीण भागात ज्याला २४०० कॅलरी मिळू शकत नाहीत तो दारिद्र्यरेषेखाली (Below Poverty Line) समजला जाई. '२४०० कॅलरी मानक' हे निरपेक्ष मानक आहे. किमान पोट भरण्यासाठी श्रीमंतालाही २४०० कॅलरी लागतात आणि गरिबालाही २४०० कॅलरीच लागतात. एवढेच की श्रीमंत ते मिळवू शकतात आणि गरीब मिळवू शकत नाही. 'भारतात दारिद्र्य मोजण्यासाठी निरपेक्ष दारिद्र्य विचारात घेतात.' जागतिक बँकदेखील प्रतिव्यक्ति प्रतिदिन '१.२५ डॉलर क्रयशक्ती' हे निरपेक्ष मानक वापरते.

## २. सापेक्ष दारिद्र्य (Relative Poverty) :-

- या संकल्पनेत लोकसंख्येतील श्रीमंत व गरीब यांची तुलना करुन एक सरासरी काढली जाते. यानंतर सरासरीपेक्षा कमी उत्पन्न असणाऱ्या लोकसंख्येचे प्रमाण विचारात घेतले जाते. 'त्याच्यापेक्षा हा गरीब' याला सापेक्षता म्हणावे. यामुळे सापेक्ष दारिद्र्य मोजणी पध्दतीत विविध गटांची उत्पन्न पातळी व उत्पन्नाचे वितरण विचारात घेतले जाते.

| दारिद्र्याचे परिणाम | |
|---|---|
| **आर्थिक परिणाम** | **सामाजिक परिणाम** |
| I. अल्प राष्ट्रीय उत्पन्न<br>II. वाढती बेकारी<br>III. अल्प बचत व गुंतवणूक<br>IV. अल्प उत्पादन<br>V. अल्प भांडवल निर्मिती | I. वर्ग संघर्ष<br>II. जगण्याची दयनीय परिस्थिती<br>III. असामाजिक कृत्ये<br>IV. राष्ट्र विघातक कृत्ये |

## ❖ दारिद्र्याचे निर्देशांक :-

### अ) उपासमारीचा निर्देशांक (Hunger Index) :-


- दारिद्र्याचा सर्वात महत्त्वाचा निर्देशांक म्हणजे उपासमार होय. त्याचे मोजमाप करण्यासाठी जागतिक उपासमार निर्देशांक काढला जातो.
- International food Policy Research Institute (IFPRI) : ही संस्था GHI चे मोजमाप करते. या संस्थेला Wealthungerhilfe (जर्मनी) आणि Concern Worldwide (आयर्लंड) या संस्था मदत करतात.
- GHI काढताना तीन घटकांचा विचार केला जातो.
- एकूण लोकसंख्येपैकी कुपोषणाचे प्राबल्य
- ५ वर्षाखालील बालकांमधील कुपोषणाचे प्रमाण
- बालमृत्यूदर (५ वर्षाखालील)
- GHI हा ० ते १०० दरम्यान दर्शवला जातो. निर्देशांक ० म्हणजे उपासमार नसणे तर १०० म्हणजे अतिजास्त उपासमार असणे.




| GHI Severity Scale | | | | |
|---|---|---|---|---|
| ≤ 9.9 low | 10.0–19.9 moderate | 20.0–34.9 serious | 35.0–49.9 alarming | 50.0 ≤ extremely alarming |
| 0 | 10 | 20 | 35 | 50 |

## ग्लोबल हंगर इंडेक्स

| देश | क्रमांक (२०१६) | क्रमांक (२०१७) |
|---|---|---|
| चीन | २९ | २९ |
| नेपाळ | ७२ | ७२ |
| म्यानमार | ७५ | ७७ |
| श्रीलंका | ८४ | ८४ |
| बांग्लादेश | ९० | ८८ |
| भारत | ९७ | १०० |
| पाकिस्तान | १०७ | १०६ |



## ❖ मानव विकास निर्देशांक (Human Development Index) :-

- **मानव विकासाच्या तीन बाजु समजल्या जातात.**

१) जीवनमान (दीर्घ आणि निरोगी) २) शिक्षण (ज्ञानाची सुगमता) ३) चांगले राहणीमान (क्रयशक्ती)

- या सूत्राचा वापर करुन या तिन्ही घटकांचा निर्देशांक काढला जातो.

$$\text{निर्देशांक} = \frac{\text{प्रत्यक्ष मूल्य} - \text{किमान मूल्य}}{\text{कमाल मूल्य} - \text{किमान मूल्य}}$$

- या तिन्ही निर्देशांकाची सरासरी म्हणजे मानव विकास निर्देशांक होय.
- या निर्देशांकाचे रचनाकर्ते : १) महबूब-उल-हक २) अमर्त्य सेन
- मानव विकास निर्देशांक ० ते १ च्या दरम्यान असतो. ० म्हणजे मानव
- विकास झाला नाही तर १ म्हणजे पूर्ण मानव विकास होय.

| निर्देशांकावर आधारीत वर्गवारी | |
|---|---|
| देशांचे गट | मानव विकास निर्देशांक |
| अतिउच्च मानव विकास | ०.८०० पेक्षा जास्त |
| उच्च मानव विकास | ०.७०० ते ०.७९९ |
| मध्यम मानव विकास | ०.५५० ते ०.६९९ |
| कमी मानव विकास | ०.५५० पेक्षा कमी |

## ❖ UNDP (United Nation Development Program) चा मानव विकास अहवाल :-

- ही संयुक्त राष्ट्रसंघाची एक संघटना सरासरी प्रत्येक वर्षी मानव विकास अहवाल जाहीर करते. १९९० मध्ये पहिला मानव विकास अहवाल प्रकाशित करण्यात आला.
- पाकिस्तानचे महबूब-उल-हक आणि भारताचे नोबेल विजेते अमर्त्य सेन यांनी यातील मानव विकास निर्देशांकाची रचना केली. तेव्हापासून जगातील बहुतांश राष्ट्रांचा मानव विकास निर्देशांक या अहवालात प्रकाशित केला जातो.
- २०१५ पर्यंत UNDP ने २४ मानव विकास अहवाल प्रकाशित केले आहेत.
- UNDP कडील आकडेवारीमध्ये विविध देशांचे १९८० पासूनचे मानव विकास निर्देशांक उपलब्ध आहेत. २०१६ च्या अहवालाचा विषय 'Human Development for Everyone' हा होता.
- UNDP ने २०१६ चा (एकूणात २५वा) मानव विकास अहवाल २१ मार्च २०१७ ला स्टॉकहोम (स्वीडन) येथून प्रकाशित करण्यात आला.
- २०१६ च्या अहवालात १८८ देशांचा २०१५ मधील मानव विकास निर्देशांक दिला आहे. यापैकी नॉर्वे (०.९४९) प्रथम क्रमांकावर असून मध्य आफ्रिकन प्रजासत्ताक (०.३५२) शेवटच्या क्रमांकावर आहे.
- जगाचा सरासरी मानव विकास निर्देशांक ०.७१७ आहे भारताचा या यादीत १३१ वा क्रमांक असून, भारताचा मानव विकास निर्देशांक ०.६२४ आहे. वरील आकडेवारीनुसार भारत 'मध्यम विकसित देशांच्या' यादीत बसतो.
- BRICS देशांपैकी रशिया, ब्राझील, चीन व दक्षिण आफ्रिका यांचा मानव विकास निर्देशांकानुसार अनुक्रमे ४९, ७९, ९० आणि ११९ वा क्रमांक लागला. २०१० ते २०१५ या काळात चीन ११ क्रमांकांनी तर भारत ४ क्रमांकांनी वर ढकलला गेला आहे.

### ❑ भारताबद्दल :

- २००२ – भारतात सर्वात प्रथम मध्य प्रदेशाने मानवी विकास अहवाल जाहीर केला.
- २०१४ नुसार भारतात मानवी विकास साध्य करणारे राज्य :

१) केरळ २) दिल्ली ३) गोवा ४) पंजाब ५) महाराष्ट्र (०.५७२)

- २०११ चा महाराष्ट्राचा मानवी विकास अहवाल जुलै २०१४ मध्ये सादर करण्यात आला. (विधानसभा)

१) रत्नागिरी २) सिंधदूर्ग ३) मुंबई उपनगर

❑ १४ डिसेंबर २०१५ मध्ये २०१४ चा मानव विकास अहवाल UNDP ने सादर केला. त्यानुसार :-

- अतिउच्च HDI : १.नॉर्वे - ०.९५७ २. आयर्लंड -०.९५५ ३.स्वित्झर्लंड -०.९५५
- उच्च HDI : १. त्रिनिदाद आणि टोबीगो - ०.७९६ २.अल्बानिया - ०.७९५ ३. क्युबा - ०.७८३
- मध्यम HDI : १. कझाकस्तान - ०.६९७ २.मोरोक्को - ०.६८६ ३. गुयाना - ०.६८२
- कमी HDI : १. मौरीतानीन - ०.५४६ २. बेनीन - ०.५३५ ३. युगांडा - ०.५४४

## First five Very high human devlopment

| Rank | Country / Territory | HDI | |
|---|---|---|---|
| 2016 estimates for 2015 | | 2016 estimate for 2015 | Changes from previous year |
| 1 | Norway | 0.949 | + 0.001 |
| 2 | Australia | 0.939 | + 0.002 |
| 3 | Switzerland | 0.939 | + 0.001 |
| 4 | Germany | 0.926 | + 0.002 |
| 5 | Denmark | 0.925 | + 0.002 |
| **Last five Very high human devlopment** | | | |
| 47 | Bahrain | 0.824 | + 0.001 |
| 48 | Montenegro | 0.807 | + 0.003 |
| 49 | Russia | 0.804 | - 0.001 |
| 50 | Romania | 0.802 | + 0.004 |
| 51 | Kuwait | 0.800 | + 0.001 |

## First five high human devlopment

| Rank | Country / Territory | HDI | |
|---|---|---|---|
| 2016 estimates for 2015 | | 2016 estimate for 2015 | Changes from previous year |
| 52 | Belarus | 0.796 | - 0.002 |
| 53 | Oman | 0.796 | + 0.001 |
| 54 | Barbados | 0.795 | + 0.001 |
| 55 | Uruguay | 0.795 | + 0.001 |
| 56 | bulgaria | 0.794 | + 0.002 |
| **Last five high human devlopment** | | | |
| 102 | Vibya | 0.716 | - 0.003 |
| 103 | Belize | 0.706 | ------- |
| 104 | Samoa | 0.704 | + 0.002 |
| 105 | Maldives | 0.701 | ------- |
| 106 | Uzbekistan | 0.701 | + 0.004 |

## First five Medium human devlopment

| Rank | Country / Territory | HDI | |
|---|---|---|---|
| 2016 estimates for 2015 | | 2016 estimate for 2015 | Changes from previous year |
| 107 | Moldova | 0.699 | - 0.002 |
| 108 | Botswana | 0.698 | ------- |
| 109 | Gabon | 0.697 | + 0.003 |
| 110 | Paraguay | 0.693 | + 0.001 |
| 111 | Egypt | 0.691 | + 0.003 |

## Last five Medium human devlopment

| | | | |
|---|---|---|---|
| 143 | Cambodia | 0.563 | + 0.005 |
| 144 | Nepal | 0.558 | + 0.003 |
| 145 | Myanmar | 0.556 | + 0.005 |
| 146 | Kenya | 0.555 | + 0.005 |
| 147 | Pakistan | 0.550 | + 0.002 |

## First five Low human devlopment

| Rank | Country / Territory | HDI | |
|---|---|---|---|
| 2016 estimates for 2015 | | 2016 estimate for 2015 | Changes from previous year |
| 148 | Swaziland | 0.541 | ------- |
| 149 | Syria | 0.536 | - 0.017 |
| 150 | Angola | 0.533 | + 0.002 |
| 151 | Tanzania | 0.531 | + 0.012 |
| 152 | Nigeria | 0.527 | + 0.002 |

## Last five Low human devlopment

| | | | |
|---|---|---|---|
| 184 | Burundi | 0.404 | - 0.002 |
| 185 | Burkina faso | 0.402 | + 0.003 |
| 186 | Chad | 0.396 | + 0.002 |
| 187 | Niger | 0.353 | + 0.002 |
| 188 | Central african republic | 0.352 | + 0.005 |


## India's Medium human devlopment

| Rank | Country / Territory | HDI | |
|---|---|---|---|
| 2016 estimates for 2015 | | 2016 estimate for 2015 | Changes from previous year |
| **131** | **India** | **0.624** | **+ 0.009** |


## ❖ सामाजिक समावेशन (Social Inclusion) :-

### अ) असमानता समायोजित मानव विकास निर्देशांक (Inequality adjusted Human Development Index - IHDI):-

- मानव विकास निर्देशांकाचे तिन्ही आयाम (दीर्घ व निरोगी जीवन, ज्ञानाची सुगमता, चांगले राहणीमान) मोजून तिन्ही आयामांचे निर्देशांक काढले जातात.
- या तिन्ही निर्देशांकाचे असमानतेवर आधारीत नवीन तीन असमानता समायोजित निर्देशांक काढले जातात. शेवटी या तीन निर्देशांकावरुन असमानता समायोजित मानव विकास निर्देशांक (IHDI) काढला जातो.
- HDI व IHDI सारखा असणे म्हणजे मानव विकासात संपूर्ण समानता असणे. HDI व IHDI मध्ये जेवढी तफावत जास्त, तेवढी विकासातील असमानता जास्त.




**भारत : असमानता समायोजित मा.वि.नि. (HDI) २०१५**




| | निर्देशांक | निर्देशांक पासून तफावत |
|---|---|---|
| असमानता आयुर्मान निर्देशांक | ०.५६५ | २४ % ची घट |
| असमानता शिक्षण निर्देशांक | ०.३२४ | ३९.४ % ची घट |
| असमानता उत्पन्न निर्देशांक | ०.५१२ | १६.१ % ची घट |
| असमानता समायोजित निर्देशांक | २७.२ | २७.२ % ची घट |
| असमानता विकास निर्देशांक | ०.६२४ | |

### ब) लिंग असमानता निर्देशांक (Gender Inequality Index - GII):-

१. GII काढतानाचे तीन आयाम मात्र वेगळे आहेत. GII काढण्यासाठी खालील आयाम विचारात घेतात.

**प्रजनन स्वास्थ्य –** यासाठी माता मृत्यूदर आणि पौंगडावस्थेतील जननदर मोजून प्रजनन आरोग्याचा निर्देशांक काढला जातो. माता मृत्यूदर १० च्या प्रमाणात काढला जातो.

**सशक्तीकरण –** स्त्री व पुरुषांचा संसदेतील सहभाग व माध्यमिक शिक्षणातील प्रमाण काढले जाते.

**रोजगार क्षेत्र –** रोजगार क्षेत्रातील स्त्री व पुरुषांचा सहभाग विचारात घेतला जातो.

शेवटच्या दोन आयामांमधील स्त्री व पुरुषांच्या प्रमाणावरुन आणि स्त्रियांच्या प्रजनन आरोग्य निर्देशांकावरुन स्त्री विकास निर्देशांक आणि पुरुष विकास निर्देशांक काढला जातो. या दोन्ही निर्देशांकांवरुन शेवटी लिंग आधारित मानव विकास निर्देशांक काढला जातो.

२. लिंग असमानता निर्देशांक ० ते १ च्या दरम्यान असतो. मात्र त्याची किंमत मानव विकास निर्देशांकांच्या उलट असते. ० म्हणजे लिंगसमानता दर्शविते तर १ म्हणजेच तीव्र लिंग असमानता (पुरुष किंवा स्त्री) दर्शविते.
३. उदा. – भारताचा GII ०.५३० आहे. म्हणजे भारतात लिंग असमानता आहे. म्हणजे पुरुष आणि स्त्रियांपैकी कोणीतरी पुढे आणि कुणीतरी मागे आहे, उरलेली आकडेवारी (उदा. संसदेतील, रोजगारातील सहभाग) आपल्याला स्त्रियाच मागे आहेत हे दर्शवते.
४. UNDP च्या २०१५ अहवालानुसार भारताचा २०१४ मधील GII ०.५६३ आहे आणि भारताचा या यादीत १३० वा क्रमांक आहे.
५. UNDP च्या २०१६ अहवालानुसार भारताचा २०१५ मधील GII ०.५३० आहे आणि भारताचा या यादीत १२५ वा क्रमांक आहे.
६. भारताचा लिंग असमानता निर्देशांक ०.५३० आहे जो मानव विकासातील 'लिंग आधारीत व्यावर्तन' दर्शवितो.
७. २०१६ या अहवालानुसार भारतात अजूनही माता मृत्यूदर १७४, पौगंडावस्थेतील जननदर २४.५, स्त्रियांचा संसदेतील सहभाग १२.२%, माध्यमिक शिक्षित स्त्रियांचे प्रमाण ३५.३%, रोजगार क्षेत्रातील स्त्रियांचा सहभाग २६.८% आहे.

### भारत : लिंग असमानता निर्देशांक

| प्रमाणक | मूल्य (२०१४) | मूल्य (२०१५) |
|---|---|---|
| माता मृत्यूदर | १९० | १७४ |
| पौगंडावस्थेतील जननदर | ३२.८ | २४.५ |
| संसदेतील सहभाग (स्त्रिया) | १२.२% | १२.२% |
| संसदेतील सहभाग (पुरुष) | ८८.८% | ८८.८% |
| माध्यमिक शिक्षित (स्त्रिया) | २७% | ३५.३ |
| माध्यमिक शिक्षित (पुरुष) | ५६.६% | ६१.४% |
| रोजगारक्षेत्रातील सहभागाचा दर (स्त्रिया) | २७% | २६.८% |
| रोजगारक्षेत्रातील सहभागाचा दर (पुरुष) | ७९.९% | ७९.१% |
| लिंग असमानता निर्देशांक | ०.५६३ | — |


## क) लिंग आधारीत विकास निर्देशांक (Gender Related Development Index or Gender Development Index - GDI):-

- १९९५ मध्ये प्रकाशित करण्यात आलेल्या पध्दतीत मानव विकासाच्या तिन्ही आयमांमधील (दीर्घ आणि निरोगी जीवन, ज्ञानाची सुगमता, चांगले राहणीमान) तफावत मोजून GDI काढला जात असे.
- २०१४ मध्ये मांडण्यात आलेल्या नवीन पध्दतीत स्त्री विकास निर्देशांक आणि पुरुष विकास निर्देशांक स्वतंत्रपणे मोजले जातात. शेवटी स्त्री विकास निर्देशांकाचे पुरुष विकास निर्देशांकाशी असलेले प्रमाण काढले जाते. हे प्रमाण म्हणजे GDI होय.
- पुरुष आणि स्त्रियांमधील विकास समान अपेक्षित असेल, तर GDI ची किंमत १ असावी. GDI १ पेक्षा कमी असणे म्हणजे पुरुषांपेक्षा स्त्रियांचा विकास कमी असणे आणि GDI १ पेक्षा जास्त असणे म्हणजे स्त्रियांपेक्षा पुरुषांचा विकास कमी असणे.
- UNDP च्या २०१५ च्या अहवालात भारताचा GDI ०.७९५ आहे. UNDP च्या २०१६ च्या अहवालात भारताचा GDI ०.८१९ आहे.
- २०१५ च्या अहवालानुसार स्त्री विकास निर्देशांक ०.५२५ तर पुरुष विकास निर्देशांक ०.६६० आहे. यावरुन भारताचा GDI ०.७९५ येतो. २०१६ च्या अहवालानुसार स्त्री विकास निर्देशांक ०.५४९ तर पुरुष विकास निर्देशांक ०.६७१ आहे. यावरुन भारताचा GDI ०.८१९ येतो.

### भारत : लिंग आधारित विकास निर्देशांक

| प्रमाणक | मूल्य (२०१४) | मूल्य (२०१५) |
|---|---|---|
| आयुर्मर्यादा (स्त्रिया) | ६९.५ | ६९.९ |
| आयुर्मर्यादा (स्त्रिया) | ६६.६ | ६६.९ |
| शाळेत जाण्याची सरासरी वर्ष (स्त्रिया) | ३.६ | ४.८ |
| शाळेत जाण्याची सरासरी वर्ष (पुरुष) | ७.२ | ८.२ |
| शाळेत जाण्याची अपेक्षित वर्ष (स्त्रिया) | ११.३ | ११.९ |
| शाळेत जाण्याची अपेक्षित वर्ष (पुरुष) | ११.८ | ११.३ |
| दरडोई GNI PPP उत्पन्न $ (स्त्रिया) | २,११६ | २१८४ |
| दरडोई GNI PPP उत्पन्न $ (पुरुष) | ८,६५६ | ८८९७ |
| स्त्री मानव विकास निर्देशांक | ०.५२५ | ०.५४९ |
| पुरुष मानव विकास निर्देशांक | ०.६६० | ०.६७१ |
| लिंग आधारित विकास निर्देशांक (स्त्री मानव विकास निर्देशांकाचे पुरुष मानव विकास निर्देशांकाशी प्रमाण) | ०.७९५ | ०.८१९ |

# बेरोजगारी




## ❖ व्याख्या :-

- उत्पादनाच्या श्रम या घटकाला (व्यक्तीला) त्याच्या पात्रतेनुसार व प्रचलित वेतनानुसार कामाची मागणी मिळत नाही तेव्हा त्यास 'बेकारी बेरोजगारी' म्हणतात. बेरोजगारीची व्याख्या 'कार्यकारी लोकसंख्येपर्यंतच' मर्यादित ठेवावी लागते. लोकसंख्येतील बालक, वृध्द इत्यादी घटक वजा केल्यावर जी उरते तिला 'कार्यकारी लोकसंख्या' म्हणतात.

- **ऐच्छिक बेरोजगारी** – समाजातील काही व्यक्ती कोणत्याही कारणामुळे स्वत:च्या इच्छेने म्हणजे स्वच्छेने रोजगारविना राहणे पसंत करतात या अवस्थेस 'ऐच्छिक बेरोजगारी' असे म्हणतात.

- **अनैच्छिक बेरोजगारी** – काम करण्याची क्षमता असणारी व्यक्ती प्रचलित मजुरी दरानुसार काम करण्यास तयार असते. पण काम करण्याची इच्छा असूनही त्या व्यक्तीच्या अंगी असलेल्या क्षमतेच्या दृष्टीने योग्य असे काम मिळत नसेल तर त्या अवस्थेस 'अनैच्छिक बेरोजगारी' म्हणतात.

### बेरोजगारीचे प्रकार

**ग्रामीण बेरोजगारी**

१) हंगामी बेरोजगारी
२) प्रच्छन्न / अदृश्य बेरोजगारी

**शहरी बेरोजगारी**

१) संरचनात्मक बेरोजगारी
२) शैक्षणिक बेरोजगारी
३) कमी प्रतीची बेरोजगारी
४) घर्षणात्मक बेरोजगारी
५) चक्रीय बेरोजगारी

## A] शहरी बेरोजगारी :-

**१) संरचनात्मक बेरोजगारी (Structural Unemployment) :-** संरचना म्हणजे भारतीय अर्थव्यवस्थेची रचना. भारतीय अर्थव्यवस्थेची रचनाच अशी आहे, की येथे लोकसंख्या अधिक असल्यामुळे 'मजुरांची मागणी कमी पण पुरवठा जास्त' अशी अवस्था आहे. वाढत्या नागरीकरणामुळे, कामरहीत वृध्दीमुळे, श्रमशक्ती वर्गात वाढ झाल्यामुळे, अनुचित तंत्रज्ञान व अनुचित शिक्षण प्रणालीमुळे संरचनात्मक बेरोजगारी जास्त आहे. औद्योगिक विकासदर कमी असल्यामुळे पुरेसा रोजगार उपलब्ध होऊ शकत नाही. वाढत्या नागरीकरणामुळे ग्रामीण भागातील कुटीर आणि लघुउद्योगांचा ऱ्हास होतोय. त्यामुळे ग्रामीण भागातील रोजगारक्षमता कमी होतेय.

**२) शैक्षणिक बेरोजगारी (Educated Unemployment) :-** शिक्षण घेऊनही काम न मिळणे म्हणजे शैक्षणिक बेरोजगारी. शैक्षणिक बेरोजगारीचे मूळ कारण 'संथ आर्थिक विकास' आहे. भारतात या कारणासोबतच सदोष शिक्षण व्यवस्था, तांत्रिक शिक्षणाचा तसेच योग्य शिक्षण पातळीचा अभाव, शिक्षित लोकांच्या मागणी व पुरवठयातील मोठी तफावत ही देखील कारणे राहिलेली आहेत.

**३) कमी प्रतीची बेरोजगारी (Underemployment) :-** इच्छित क्षमतेपेक्षा कमी क्षमतेचे काम करावे लागणे म्हणजे कमी प्रतीची बेरोजगारी. उदा. एखाद्या शाळेतील शिपायाला उत्तम शिकविता येऊ शकते. पण योग्य पात्रता नसल्यामुळे त्याला शिपायाचेच काम करावे लागते. भारतात शैक्षणिक बेरोजगारी या प्रकारातही बऱ्याच वेळा कमी प्रतीची बेरोजगारी पाहावयास मिळते. उदा. एखाद्या उच्चशिक्षित माणसाला एखादे साधे काम करावे लागणे.

**४) घर्षणात्मक बेरोजगारी (Frictional Unemployment) :-** या बेरोजगारीला यंत्रिकृत बेरोजगारी असेही म्हणतात. बाजारातील मागणी, पुरवठा, तंत्रज्ञान, कौशल्य, आदाने इत्यादी अनेक कारणांमुळे उत्पादनतंत्रात अमूलाग्र बदल होतात. बदलेल्या तंत्रामुळे कार्यकारी गटाच्या मागणीतही बदल होत जातात. घर्षणात्मक बेरोजगारी उत्पादन पूर्ण रोजगार पातळीवर असले, तरी उद्‌भवू शकते.
उदा. काही वर्षांपूर्वी बाजारात पेजरची मागणी असायची. मोबाईल आल्यामुळे पेजरचे उत्पादन बंद पडले. म्हणजे पेजर उद्योगात गुंतलेले मजूर बेरोजगार झाले.

## B] ग्रामीण बेरोजगारी :-

**१) हंगामी बेरोजगारी (Seasonal Unemployment) :-** देशात फक्त २५% शेतांमध्येच २ किंवा २ पेक्षा जास्त पिके घेतली जातात. म्हणजे ७५% शेतांमध्ये राबणारे शेतकरी ६ महिने बेरोजगारच असतात. कोरडवाहू शेतांमध्ये तर ८ महिने बेरोजगारीचीच अवस्था असते. शेतकऱ्यांची ही अवस्था शेतमजुरांची याहून वाईट अवस्था असते. ऊसतोड कामगारांसारख्या लोकांना ऊसतोडणीच्या हंगामातच रोजगार मिळतो. इतर हंगामात ते पूर्ण बेरोजगार असतात.

**२) प्रच्छन्न / अदृश्य बेरोजगारी (Disguised Unemployment) :-** अविकसित तसेच (भारतासारख्या) विकसनशील देशांमध्ये विशेषत: कृषी क्षेत्रात प्रच्छन्न बेरोजगारी पाहावयास मिळते. कृषी क्षेत्रात बऱ्याच वेळा आवश्यकतेपेक्षा जास्त लोक काम करत असतात. खरे तर इतक्या लोकांची तिथे आवश्यकता नसते. अशा कामातून एखाद-दुसरा माणूस काढून टाकला तरी कामावर किंवा उत्पादकतेवर काहीच परिणाम होत नाही. म्हणजे या जास्तीच्या माणसांनी काम केलं नाही तरी चालतं. त्यांच्या श्रमाला जास्तीचे श्रम (Surplus Labour) म्हणावे. तसेच त्यांची सीमांत उत्पादकता 'शून्य' म्हणावी. अशा जास्तीच्या श्रम करणाऱ्या व्यक्तींना (ज्यांची उत्पादकता शून्य आहे), प्रच्छन्न बेरोजगार म्हणावे.

## ❖ बेरोजगारीची कारणे :-

१. असमान रोजगार संधी
२. अल्प वेतन
३. शहरीकरण
४. यांत्रिकीकरण
५. अतिरिक्त लोकसंख्या
६. निरक्षरता
७. मागणीच्या संरचनेतील बदल
८. औद्योगिक कलह
९. कोरडवाहू शेती
१०. संयुक्त कुटुंबपद्धती
११. हस्तकला व ग्रामोद्योगांचा ऱ्हास
१२. औद्योगिकीकरणाचा मंद वेग

**बेकारीचे परिणाम**

**आर्थिक परिणाम**

१. संसाधनांचा अपव्यय
२. कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी अवघड
३. दारिद्र्य व उत्पन्न विषमता
४. अनौपचारिक क्षेत्राची वाढ
५. आर्थिक गुन्हेगारीत वाढ
६. अनुत्पादक लोकसंख्येचा वाढता भार

**सामाजिक परिणाम**

१. सामाजिक तणाव आणि अशांतता
२. मानवी मूल्यांचा ऱ्हास
३. निष्क्रियता (अक्षमता)

## ❖ बेरोजगारीचा दर :-

- NSSO (National Sample Survey Office) रोजगार व बेरोजगारीविषयक माहिती संकलित करुन दर ५ वर्षांनी भारतातील रोजगार-बेरोजगारीच्या निर्देशफलकाचा अहवाल (Key Indicators of Employment & Unemployment in India) प्रकाशित करत असते. १९७२-७३ ला NSSO ने आपल्या २७ व्या मोजणी फेरीत देशाचा असा पहिला अहवाल प्रकाशित केला. NSSO ने २००४-०५८ मधील ६१ व्या मोजणी फेरीत 'सातवा' आणि २००९-१० मधील ६६ व्या मोजणी फेरीत 'आठवा' आणि २०११-१२ मधील ६८ व्या मोजणी फेरीत 'नववा' अहवाल प्रकाशित केला. या अहवालांमध्ये वापरल्या गेलेल्या विविध संकल्पना, व्याख्या आणि पध्दती या दांतवाला समितीने सुचविलेल्या शिफारशींनुसार असतात.

- NSSO कार्यकारी लोकसंख्या आणि बेरोजगारीत लोकसंख्येचे प्रमाण मोजते. रोजगारीत लोकसंख्या मोजताना नियमित, स्वयं व नैमित्तिक (Casual) रोजगारी मोजले जाते. यात अर्धरोजगारी मोजली जात नाही. NSSO रोजगाराचे व बेरोजगाराचे आकडे ४ प्रकारांत प्रकाशित करते. हे प्रकार खालीलप्रमाणे आहेत :-

### १. सर्वसाधारण मुख्य स्थिती (UPS – Usual Principal Status):

| UPS - Usual Principal Status | | |
|---|---|---|
| लोकसंख्या (कोटी) | २००९-१० | २०११-१२ |
| कार्यकारी | ४३.८९ | ४४.७ (३६.४%) ← LFPR |
| रोजगारीत | ४२.७९ | ४३.४६ (३५.४%) ← WPR |
| बेरोजगारीत | १.१ | १.२४ (१%) ← PU |
| बेरोजगारीचे प्रमाण | २.५ % | २.७% ← UR |

### २. सर्वसाधारण स्थिती (US – Usual Status) :

| US – Usual Status | | |
|---|---|---|
| लोकसंख्या (कोटी) | २००९-१० | २०११-१२ |
| कार्यकारी | ४६.८८ | ४८.३७ (३९.५%) ← LFPR |
| रोजगारीत | ४५.९ | ४७.२९ (३८.६%) ← WPR |
| बेरोजगारीत | ०.९८ | १.०८ (०.९%) ← PU |
| बेरोजगारीचे प्रमाण | २.० % | २.२% ← UR |

### ३. वर्तमान साप्ताहिक स्थिती (CWS - Current Weekly Status):

| CWS – Current Weekly Status | | |
|---|---|---|
| लोकसंख्या (कोटी) | २००९-१० | २०११-१२ |
| कार्यकारी | ४५.०४ | ४६.२७ (३७.७%) ← LFPR |
| रोजगारीत | ४३.४२ | ४४.५६ (३६.४%) ← WPR |
| बेरोजगारीत | १.६२ | १.७१ (१.४%) ← PU |
| बेरोजगारीचे प्रमाण | ३.६ % | ३.७% ← UR |

### ४. वर्तमान दैनिक स्थिती (CDS – Current Daily Status):-


| CDS – Current Daily Status | | |
|---|---|---|
| लोकसंख्या (कोटी) | २००९-१० | २०११-१२ |
| कार्यकारी | ४२.८९ | ४४.०४ (३५.९%) ← LFPR |
| रोजगारीत | ४०.०८ | ४१.५७ (३३.९%) ← WPR |
| बेरोजगारीत | २.८१ | २.४७ (२%) ← PU |
| बेरोजगारीचे प्रमाण | ६.६ % | ५.६% ← UR |

## ❖ भारतातील बेरोजगारी दरास वाढ :

- सन २०१३-१४ या राजकोषीय वर्षात अखिल भारतीय पातळीवर बेरोजगारीचा दर ४.९% इतका असल्याचे स्पष्ट झाले.
- हा अहवाल केंद्रीय श्रम ब्युरोने प्रसिध्द केला आहे. शहरी भागातील बेरोजगारीतील ५.७% टक्क्यावरुन ५.५% (२०१३-१४) इतकी कमी झाली आहे. ग्रामीण भागातील बेरोजगारीत ४.७% इतकी वाढ झाली आहे. अगोदर ४.४% दर होता.

| | २०१२-१३ | २०१३-१४ |
|---|---|---|
| बेरोजगारी दर | | |
| शहरी बेरोजगारी | ५.७% | ५.५% |
| ग्रामीण बेरोजगारी | ४.४% | ४.७% |
| ग्रामीण भागातील पुरुष बेरोजगारी | ४% | ४.१% |
| ग्रामीण भागातील महिला बेरोजगारी | ७.२% | ७.७% |

## फिलिप्स वक्ररेषा




- विल्यम फिलिप्सने फिलिप्स वक्ररेषा मांडली. जसजसा महागाईचा दर वाढत जातो, बेरोजगारी कमी होत जाते. तसाच महागाईचा दर कमी होत असल्यास बेरोजगारीचा दर वाढत जातो. समजा, एखाद्या देशात बिंदू '१' या ठिकाणी बेरोजगारी असेल आणि ही बेरोजगारी कमी करायची असेल, तर त्या देशाला असं काही करावं लागेल, की तो बिंदू '२' वर येईल. बिंदू '२' म्हणजे जास्त महागाईचा दर.
- याचा अर्थ शासनाने बेरोजगारी कमी करण्यासाठी महागाई (चालणाऱ्या महागाई) कडे झुकणारे धोरण राबविले पाहिजे.
- मिल्टन फ्रिडमन मात्र या वक्ररेषेवर टीका करताना दिसतो. प्रत्यक्षात असे घडणे अल्पावधीत शक्य असले, तरी दीर्घावधीत अशी वक्ररेषा आढळत नाही. तसेच Stagflation (Stagnation + Inflation) अशा आलेखात दाखविता येत नाही, अशीही टीका त्याने यावर केलीय.

★★★★★★★★★★★★★★★★★★★★